**पुनरागमनायच**

नमस्कार मंडळी

'अतिथी देवो भव' यावर मागच्या पाळीला यजमानांसाठी 'आचारसंहिता' याबद्दल सांगितल्यावर आपल्याही सूचना-विचार कळवावे, अशी विनंती केली होती. तेंव्हा 'पाहुण्यांसाठीही आचारसंहिता तयार करावी', असे बऱ्याच जणांनी सुचवले.

'सास भी कभी बहू थी' ह्यानुसार पाहुण्यांनी जर आचारसंहिता पाळली तर उभयतांना आनंद होईल. काही प्रसंग मला ऐकवण्यात आले, त्यातले निवडक:

१. एयरपोर्टवरुन फोन आला-"अहो, मी तुमच्या पार्ल्याच्या भावाशेजारीच राहतो. आम्ही आता येथे आलो आहोत. आपण येता का आम्हाला घ्यायला?" अचानक खाडकन् ऊठून त्यांना घ्यायला गेलो. तर त्यांच्याबरोबर आणखी एक जोडपे होते. २-४ दिवसाऐवजी त्यांचा मुक्काम ८ दिवस झाला. त्यांची सरबराई करण्यातच सगळे मग्न झाले. फोनची बिलं, shopping ला नेणे इ. ओघाने आलेच!

'मान ना मान मै तेरा मेहमान' अशीच परिस्थिती'! पण मुंबईला गेल्यावर त्यांनी चहालाही बोलावले नाही. शेवटी भावास पत्र लिहून कळवले की यापुढे माझा फोन नंबर आणि पत्ता कोणालाही देऊ नकोस.

२. सुधाताईंच्या नवऱ्याने ऑफिसमधून फोन करुन सांगितले की, आज माझ्या एका मित्राला जेवणासाठी घेऊन येतो आहे! आता या नवरोजींना काय म्हणावे? जेवण चटकन् तयार करुन त्यांना आईने पाठवलेले लोणचेही वाढले. त्यांना ते आवडले. पण ऐनवेळी अचानक असे पाहुणे आणू नका, म्हणून नंतर त्यांना सुनावलेही.

आणि अहो आश्चर्यम्! पंधरा दिवसांनी त्यांचेकडून एक पेटी-पार्सल आले. त्यात 'छुंदो' आणि इतर निरनिराळ्या लोणच्यांच्या बाटल्या भरल्या होत्या आणि thanks you कार्डही होते. त्यात लिहिले होते, "आपल्या आईच्या हातचे लोणचे खाण्याचे भाग्य लाभले. आमच्या फॅक्टरीत आम्ही तयार केलेली लोणची पाठवीत आहे. आपल्याला आवडतील अशी आशा आहे- कृपया स्वीकार करावा. पाहुचाराबद्दल आभार! सवडीनुसार आमच्याकडे येऊन आमच्या फॅक्टरीला भेट द्यावी. आम्हाला खूप आनंद होईल."

नंतर मी ह्यांना म्हटले, "असे कितीही पाहुणे तुमचे मित्र म्हणून आले, तर आनंदच होईल".

अशा कथांचा 'आचार संहिता' पाहुण्यांसाठी करण्यात खूप उपयोग झाला. आपण जेंव्हा 'पाहुणे' ही पदवी धारण करतो, तेंव्हा तीन टप्प्यांमधून जातो.

१. Pre-पाहुणे २. पाहुणे Post पाहुणे

त्यानुसार Pre – पाहुणे:

-ज्यांच्याकडे उतरायचे ठरवतो, त्यांना १५-२० दिवस आधी पूर्ण कल्पना द्यावी. आपण किती जण, मुक्काम किती दिवस, कार्यभाग-उद्देश...इ.

-बरोबर पुरेसे सुट्टे पैसे आणावेत- म्हणजे पाकिट हरवले, असे यजमानांना सांगावे लागत नाही.

-जास्त दिवस राहण्याची जरुर पडलीच तर हॉटेल मधे प्रस्थान ठेवावे. मित्राचे घर म्हणजे Hotel नव्हे हे लक्षात घ्यावे. शिवाय हॉटेल मधे राहिल्यास आपल्या सवडीनुसार आपल्या हौशी-मौजी भागवता येतात.

-बरोबर सहप्रवासी असतील तर त्यांना मित्राकडे नेऊ नये.

-Thanks Giving वगैरे प्रसंग असेल तर बरोबर केक वगैरे घेऊन जावे.

-आपली tooth-paste वगैरे बरोबर घेऊन जावी.

-बाहेर site-seeing साठी जायचे असल्यास सर्वांच्या lunch चा, toll चा खर्च आपण करावा.
-जेवताना दुष्काळातून आल्यासारखे दाखवू नये.
-यजमानांचे जेवण संपले की, आपणही थांबवावे.
-जेवण झाल्यावर पुरुष पाहुण्यांसानी dish washing च्या निमित्ताने उगीचच स्वयंपाकघरात घुटमळू नये.
-स्री पाहुण्यांनी living room मधे -पुढे-पुढे करत गप्पा मारत बसू नये, तर गृहिणीला मदत करण्यासाठी स्वयंपाक घरात जावे.
-'घरच्यासारखे रहावे' -असे मित्रानी म्हटले तरी त्याच्या घरचे नियम, प्रायव्हसी यांचा मान राखावा- house rules पाळावेत.
-जातायेता टीका करु नये- कारपेटचा कायापालट केला पाहिजे, मुलांना शिस्तच नाही...इ.
-तसेच खाजगीतल्या फार चांभार चौकशा करु नयेत.
-गृहिणीचा स्वयंपाक नेहमीच 'उत्तम आहे' असेच म्हणावे, अन्नाला नावे ठेऊ नयेत.
-परतताना आपली खोली व्यवस्थित आवरुन साफ ठेवावी.
-तसेच परत निघताना उपचारासाठी सलाम, वाकून नमस्कार, शेकहँड किंवा मुन्नाभाईसारखी 'प्रेमाची छप्पी' द्यावी-घ्यावी.
-हे सर्व परस्पर संमतीने, सावधानतेने उगीचच गैरसमज होणार नाही, या बेताने असावे.
-आवजो- येतो आता, वगैरे आवर्जून म्हणावे. परत घरी आल्यावर thanks you note/ card न चुकता पाठवावे.
अर्थात ह्या आचारसंहिता केवळ मार्गदर्शक आहेत. प्रत्येक प्रसंगी त्यात योग्य ते बदल करायला पाहिजेत.
-मुख्य म्हणजे पाहुणे हे 'दशमोग्रह:' होऊ नयेत.
-दोन दिवसांचा पाहुणा असतो, हे लक्षात घ्यावे.
-अंथरुण पाहून पाय पसरावेत.
-यजमानांना 'Treat others as you would like to be treated' हे लक्षात घ्यावे.
-यजमानांचा अगदी अंत पाहू नये. तुटेपर्यंत ताणू नये आणि परतताना त्यांनी 'कोपरापासून' नमस्कार करु नये, तर हातावर दही ठेऊन 'पुनरागमनायच' असे म्हणावे लागावे, असे वर्तन ठेवावे.
-All is well that ends well हे सूत्र लक्षात घ्यावे.

मात्र एक वस्तुस्थिती लक्षात येईल की पाहुणे सर्वांनाच हवे असतात. 'नसून खोळंबा, असून अडचण' अशातलाच हा प्रकार आहे. ते आपल्याला बाहेरच्या जगातल्या बातम्या पुरवतात, eyes and ears असतात. मराठी विश्व च्या membership मधे ह्यावर खूप चर्चा झाली होती. Guest member हा एक class धरला होता. पण मग आपल्या 'महान संस्कृती' प्रमाणे त्यांना 'देवो भव' म्हणून charge करु नये, असे वाटले तेंव्हा तो class काढून त्याऐवजी non-member असावे असे ठरवले गेले. 'आगंतूक पाहुण्यां'मुळे मराठी-विश्वच्या कार्यक्रमांना तोटा होऊ नये म्हणून त्यांच्याकडून जरा जास्त पैसे घ्यावी, अशी सूचना काही उदार पाहुण्यांनीच केली. ही प्रथा चालू आहे. तेव्हा non-members/guest members ह्यांना काय-काय सवलती द्याव्यात, कुठे बसायला जागा द्याव्यात...शेवटी की अगदी पहिल्या रांगेत... ह्याबद्दल आपले काही विचार असतील, तर ते कृपया 'मराठी विश्व'ला कळवावेत.
असो- 'आवजो'...'येतो आता'...
पुनरागमनायच!

प्रभाकर वि. बोपर्डीकर
pbopardikar@aol.com
718-658-3859